नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/02/2024 (शुक्रवार) सकाळ

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीस अटक
## नागपूर ग्रामीण पोलीसाची कारवाई

पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ पोलीस ठाणे भिवापूर हद्दीत पेट्रोलींग व वाहतुक केसेस करीत असता, दिनांक ०९/०२/२०२४ रोजी सकाळी ०५.३० वा. दरम्यान गोपनीय सुत्रधाराकडुन माहीती मिळाली की, भिसी ते उमरेड रोडवर १० चक्का टिप्पर क्र. MH-49/AT-7375 मध्ये अवैधरित्या विनापरवाना रेती (वाळु) टिप्परमध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून भिसी ते उमरेड रोडवर अवैध रेती वाहतुक संबंधाने अचानक नाकाबंदी करून संशयीत टिप्पर क्र. MH-49/AT-7375 येतांना दिसला. त्याचा पाठलाग करून उकळी फाटयाजवळ थांबवुन पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे ०५ ब्रास रेती मिळुन आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितले. सदरची रेती चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून टिप्पर क्र. MH-49/AT-7375 किंमती २५,००,०००/—रू. व त्यामध्ये ०५ ब्रास रेती किंमती २५,०००/—रू. असा एकुण २५,२५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून सदर टिप्पर क्र. एम. एच.— ४९/ए टी— ७३७५ चा चालक **आरोपी क्र. १) प्रदीप रंगलाल हटवार, वय ३४ वर्ष रा. आकोट त. पवनी जि. भंडारा, मालक नामे— २) महेश तलमले रा. नागपुर** यांचे विरूद्ध पोस्टे भिवापूर येथे कलम ३७९, १०९ भांदवि. सहकलम ४८(७), ४८(८) महा. जमिन महसुल सं. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधि. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पोस्टे भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. ०१) यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड, पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि. प्रमोद चौधरी, पोलीस उपनिरीक्षक सदमेक, परी पोलीस उपनिरीक्षक किरण महागावे, सफौ. नाकाडे, पोलीस अंमलदार सूरज हिवरकर, चापोशि सोरते यांचे पथकाने पार पाडली.




## जबरी चोरी

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत १२ किमी अंतरावर बीपीसीएल कंपनी जवळ बोरखेडी येथे दिनांक ०८/०२/२०२४ चे ०६.०० वा. ते ०६.०५ वा. दरम्यान फिर्यादी नामे–अमोल शांताराम सहारे, वय ४० वर्ष, रा. बोरखेडी ता. जि. नागपूर हा बीपीसीएल कंपनी जवळ बोरखेडी येथे मागील तीन वर्षापासुन किपींगचे काम करीत आहे. दि ०८/०२/२०२४ चे ५/३० वा. आपले राहते घरून कामावर पायदळ जात असता अंदाजे ६/०० वा. सुमारास एक अनोळखी ईसम आपले हातात चाकु घेवुन रोडवर फिर्यादीचे समोर आला व म्हणाला की ''चल माल निकाल'' असे म्हणुन फिर्यादीचे हातावर व मानेवर चाकुने वार करून फिर्यादीचे पॅटचे खिश्यातुन १०,०००/– रू जबरीने हिसकावुन घेवुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३९४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर गायकवाड मॅडम तसेच पोलीस निरीक्षक यादव पोस्टे बोरी यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि जगदीश पालीवार मो. नं. ८८८८८६२२५७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**